श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले यांचे गैरवर्तन व अपहाराबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२३६ /२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ-१.या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२३८७८७०/२०२६,दिनांक २२/०५/२०२६.

२. गटविकास अधिकारी पंचायत समिती अकोले यांचेकडील क्र.आस्था-२/१३६०/२०२६, दिनांक ०४/०६/२०२६.

३.सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.वशिअ-१३२५/प्र.क्र.४५/विचौ-१,मुंबई दिनांक २५ एप्रिल, २०२५.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

ज्याअर्थी, श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले येथे कार्यरत असताना गैरवर्तन व आर्थिक अपहार केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.०१ अन्वये ज्ञापन व दोषारोप ठेवण्यात आले होते. त्याअनुषंगाने श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले यांचा खुलासा अप्राप्त आहे.

सबब, श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले यांचे विरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार चौकशी करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर, उक्त नियमाच्या तरतुदींनुसार व मला प्रदान करणेत आलेल्या शक्तींचा वापर करुन श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी म्हणून सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग, नाशिक यांची व सादरकर्ता अधिकारी म्हणून जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेवतीने श्री धाकतोडे विजय लक्ष्मण, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अकोले यांची नियुक्ती करीत आहे.

नियुक्त सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीच्या तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे श्री वर्पे राजेंद्र किसन,बडतर्फ ग्रामपंचायत अधिकारी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचे आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची सक्षम प्रकारे बाजू मांडावी. विभागीय चौकशी वेळेत पुर्ण करणे कामी आवश्यक ते सर्व कामकाज नियमाप्रमाणे करावे.

विभागीय चौकशी प्रकरणीचे कामकाजात टाळाटाळ करण्याचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल, याची नोंद घ्यावी. या खाते निहाय विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७०७६००८५ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 07-07-2026 20:37:33
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, (चौकशी),
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री वर्पे राजेंद्र किसन, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत राजूर,ता.अकोले यांची गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचिका या समवेत जोडली आहे. तरी चौकशी करुन अहवाल इकडेस सादर करावा.

२. श्री धाकतोडे विजय लक्ष्मण, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती अकोले.

व्दारा व प्रत: -गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.

२/-प्रकरणी सादरकर्ता अधिकारी म्हणुन आपली नियुक्ती करण्यात आलेली असुन संदभ क्र.३ च्या परिपत्रकाचे सुक्ष्म अवलोकन करुन पुढील नियमोचित कार्यवाही करावी.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.

२/- सोबतचा आदेश श्री वर्पे राजेंद्र किसन, बडतर्फ ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास सादर करावी.

४. निवड नस्ती.

(स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर